महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण- २००१
राज्य क्रीडा विकास निधी स्थापन करणे

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.९३/क्रीयुसे-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक ३ सप्टेंबर, २००३

**प्रस्तावना :-** क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन राज्यामध्ये परिणामकारकरित्या करण्याच्या दृष्टीने राज्यात क्रीडा सुविधा विकसित करणे, राज्यातील दर्जेदार खेळाडूंना परदेशी क्रीडा मार्गदर्शकांची सेवा उपलब्ध करुन देणे व राज्यातील नावाजलेल्या खेळाडूंना अर्थसहाय्य करणे, काही गुणवान खेळाडू व संघ दत्तक घेऊन त्यांच्याद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडू घडविणे. तसेच राज्यात क्रीडा विषयक उपक्रम परिणामकारकरित्या राबविणे, असे अनेक प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होते. क्रीडा विकासामध्ये शासकीय संस्था, निमशासकीय संस्था, औद्योगिक व वाणिज्यिक प्रतिष्ठाने, स्वयंसेवी संस्था इत्यादीचा सहभाग वाढविण्याची आवश्यकता असल्यामुळे महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण-२००१ मध्ये याबाबत सर्वंकष विचार करण्यात येऊन राज्य क्रीडा विकास निधी स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

**शासन निर्णय :-** राज्य-जिल्हास्तरावर क्रीडा विकासाचे उपक्रम परिणामकारकरित्या राबविण्यासाठी तसेच राज्यातील प्रतिभावान खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाची कामगिरी करण्यास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन राज्य क्रीडा विकास निधी उभारण्यास तसेच सध्या आस्तित्वात असलेला "राष्ट्रीय क्रीडा निधी" बंद करुन त्यात जमा असलेला निधी "राज्य क्रीडा विकास निधी " मध्ये वर्ग करण्यास सुध्दा मान्यता देण्यात येत आहे.

**राज्य क्रीडा विकास निधी उभारण्याचा स्त्रोत**

(१) राज्य शासनाचा प्रतिवर्षी रु.५०.०० लाख (रुपये पन्नास लाख फक्त) वाटा.
(२) अश्वशर्यतीचे एका दिवसाचे उत्पन्न. (मुंबई शर्यत )
(३) विविध औद्योगिक प्रतिष्ठाने वा वाणिज्य प्रतिष्ठानातर्फे देण्यात येणाऱ्या देणग्या.
(४) जिल्ह्यामधून जिल्हापरिषद, महानगरपालिका व नगरपालिकेमार्फत जिल्हा विकास निधीमध्ये जमा होणाऱ्या रकमेपैकी ४०% रक्कम
(५) जिल्हा क्रीडा विकास निधीमध्ये शैक्षणिक संस्थांकडून जमा होणाऱ्या निधीपैकी ४० टक्के रक्कम.
(६) प्रदर्शनीय सामने, सांस्कृतिक कार्यक्रम इ. उपक्रमांमधून जमा होणारा निधी.

२. राज्य क्रीडा विकास निधीसाठी राज्य शासनाकडून रु. ५०.०० लाख (रुपये पन्नास लाख फक्त इतक्या मर्यादेपर्यंत अनुदान प्रत्येक वर्षी देण्यात येईल. तसेच विविध औद्योगिक/वाणिज्यीक प्रतिष्ठानार्फे स्वेच्छेने देण्यात येणाऱ्या देणग्यांच्या बदल्यात संबधित प्रतिष्ठानांना त्या बदल्यात कोणत्याही सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत.

कृ.मा.प.

<u>सदरहू निधीचे संनियंत्रण करण्यासाठी खालील समिती नियुक्त करण्यात येत आहे.</u>

| | | |
|---|---|---|
| (१) | मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण | अध्यक्ष |
| (२) | मा.राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण | उपाध्यक्ष |
| (३) | सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |
| (४) | अध्यक्ष, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स | सदस्य |
| (५) | सचिव, क्रीडा | सदस्य सचिव |
| (६) | संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे | सदस्य सहसचिव |

**निधीचा विनियोग**

(१) आंतरराष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षणासाठी आर्थिक सहाय्य देणे.

(२) शासन मान्यता प्राप्त खेळाचे परदेशी क्रीडा साहित्य आयात करण्यास अर्थसहाय्य देणे

(३) आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे/स्पर्धा/शिबीर यासाठी जाणाऱ्या खेळाडू/मार्गदर्शक/पंच यांना अर्थसहाय्य करणे.

(४) शासनामार्फत आयोजित होणाऱ्या चर्चासत्र/कार्यशाळा/उद्बोधन वर्गास अर्थसहाय्य करणे.

(५) क्रीडा वाङ्‌मय व तत्सम साहित्य निर्मितीस अर्थसहाय्य करणे.

(६) याशिवाय समितीस रास्त वाटणाऱ्या क्रीडा विकासाच्या योजनेबाबत निर्णय घेऊन अर्थसहाय्य देणे.

**निधी व्यवस्थापन:**

(१) राज्य क्रीडा निधीचे खाते अधिकृत राष्ट्रीय बँकेत बचत खाते म्हणून उघडण्यात यावे.

(२) हे बचत खाते, सचिव, क्रीडा विभाग यांच्या स्वाक्षरीने चालवावे.

(३) निधीत जमा होणारी रक्कम मुदत ठेवीमध्ये गुंतविण्याचे अधिकार समितीस राहतील.

(४) संबंधित निधीचे हिशोब सनदी लेखापाल यांच्याकडून दरवर्षी तपासून घ्यावेत.

३. सदर शासन निर्णयात अंशतः व पूर्णतः बदल करावयाचे झाल्यास यासंबंधीचे अधिकार नियोजन विभाग व वित्त विभाग या विभागांच्या मान्यतेने प्रशासकीय विभागास राहतील.

४. सदरहू आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६६६/०३/व्यय-१४, दिनांक १३.८.२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ. रा. जोशी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुंबई

३/-

पाणु, ५/१५
~~१०५४~~
~~१४~~/४२३



मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
समितीमधील सर्व संबंधित
मा.मंत्री, क्रीडा यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, क्रीडा यांचे खाजगी सचिव
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
संचालक, लेखा व कोषागारे
सचिव, क्रीडा यांचे स्वीय सहाय्यक
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हापरिषदा
सर्व महानगरपालिका
सर्व नगरपालिका
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व उप संचालक, क्रीडा व युवक सेवा
सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी
निवड नस्ती, क्रीयुसे-१

एसकां/३९०३